

# इंडोरामा कंपनीत भीषण आग

तभा वृत्तसेवा

नागपूर, २१ मार्च

21/03/2012
20:40 p.m.

**कोट्यवधींचे नुकसान**

एमआयडीसी, बुटीबोरी येथील इंडोरामा सिंथेटीक लिमिटेड मधील एचटीएम पॉवर प्रोजेक्टला आज सायंकाळी भीषण आग लागली. या आगीत कंपनीचे मोठे नुकसान झाल्याचा अंदाज आहे. आगीमध्ये या युनिटचे हीटर आणि बॉयलर पूर्णपणे जळून खाक झाले. रात्री सुमारे ८ वाजता लागलेल्या या आगीचे लोळ एक किलोमीटर लांब अंतरावरूनही दिसत होते. आग लागल्याचे लक्षात येताच इमर्जन्सी सायरन वाजवून सर्व कर्मचाऱ्यांना सतर्क करण्यात आले. इंडोरामाच्या अग्निशमन विभागाला आग विझवण्यासाठी पाचारण करण्यात आले. मात्र आगीची तीव्रता पाहता ही आग आटोक्यात आणण्यास जवळजवळ दोन तास लागले. या कामात अग्निशमन विभागाच्या ९ गाड्या लावण्यात आल्या होत्या. प्राथमिक अंदाजानुसार ऑईल ट्यूब फुटल्यामुळे ही आग लागली असावी. मात्र कंपनीचे महाव्यवस्थापक प्रबोध ओझा यांच्या मते तपासानंतरच आगीचे खरे कारण पुढे येऊ शकेल. या आगीमुळे पॉवर प्रोजेक्ट युनिटचे काम पुढील १५ दिवस ठप्प राहण्याची शक्यता आहे. ■

# इंडोरामा में भीषण आग, बायलर स्वाहा

कार्यालय प्रतिनिधि

**नागपुर.** बूटीबोरी एमआईडीसी स्थित इंडोरामा के पावर प्लान्ट परिसर में लगी भीषण आग से एक हीटर बायलर पूरी तरह स्वाहा हो गया. रात 8.15 बजे इंडोरामा के एचटीएम प्लान्ट से आग की भीषण लपटें नजर आने पर दमकल विभाग को सूचना दी गई. आग की सूचना मिलते ही बूटीबोरी व हिंगना एमआईडीसी स्थित दमकल केन्द्र के अलावा इंडोरामा और रिलायंस के 1-1 फायर ब्रिगेड ने आग पर काबू पाने की कवायद शुरू की. एचटीएम प्लान्ट के जिस आइल ट्यूब से आग शुरू हुई, उसके कारणों का पता नहीं चल पाया है. बूटीबोरी के दमकल केन्द्र प्रमुख जे.जी.जार्ज के मार्गदर्शन में लीडिंग फायरमैन डी.एम.बोंदाड़े, धनंजय भक्त सहित 23 लोगों ने करीब 2 घंटे की कड़ी मशक्कत के बाद आग पर पूरी तरह नियंत्रण पाया.

**नागपुर से गई थीं गाड़ियां**

आग की भयावहता देखते हुए नागपुर से भी 7 गाड़ियों को रवाना किया गया था, लेकिन उनके बूटीबोरी पहुंचने से पहले ही आग पर काबू पा लिया गया था. बूटीबोरी के थानेदार राजपूत आग के कारणों का पता लगा रहे हैं.